दिनांक १५/०१/२०२१ रोजी मा. जिल्हाधिकारी जळगांव यांचे अध्यक्षतेखाली आयोजित, जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी खाजगी टँकर ई-निविदा पूर्व बैठकिचे इतिवृत्त :-

दिनांक-१५/०१/२०२१ रोजी मा. जिल्हाधिकारी जळगांव यांचे अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांना खाजगी टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी खाजगी टँकर ई-निविदा पूर्व बैठक आयोजित करणेत आली होती.

जिल्ह्यात सन-२०२१ च्या टंचाई कालावधीसाठी टंचाईग्रस्त गावांना खाजगी टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी, पुरवठाधारांची निवड करणेकामी ई-निविदा प्रक्रिया दि. ०७/०१/२०२१ ते दि. २८/०२/२०२१ या कालावधीत निश्चित करण्यात आली आहे.

सदर ई-निविदा प्रक्रियेची निविदा पूर्व बैठक दिनांक-१५/०१/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात आली असुन सदर बैठकिस वरीलप्रमाणे अधिकारी व इच्छुक पुरवठाधार उपस्थित होते.

सदर बैठकिमध्ये जळगांव जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांना खाजगी टँकरने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी कंत्राटदारांची निवड करणेकरिता जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राबविण्यात आलेल्या ई-निविदेतील अटी व शर्तीबाबत चर्चा करणेत आली. सदर बैठकिस उपस्थित इच्छुक कंत्राटदार यांनी निविदेतील सर्व अटी/शर्ती मान्य असल्याचे सांगितले.

तदनंतर संबंधीत विषयाबाबत सूचना देण्यात आल्या व बैठक समाप्त करणेत आली.

जिल्हाधिकारी, जळगांव